पिंपरी चिंचवड महानगरपालिका, फ प्रभाग कार्यालय

कार्यपत्रिका क्रमांक ११

सभावृत्तांत

दिनांक:- ११/२/२०१५ वेळ. दुपारी १२.०० वा.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ प्रभाग समितीची मासिक सभा दिनांक ११/२/२०१५ रोजी दुपारी १२.०० वाजता फ क्षेत्रीय कार्यालयातील "राजर्षी शाहु महाराज सभागृहात" आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य/सदस्या उपस्थित होते.

१. मा.वनिता एकनाथ थोरात सभापती
२. मा.पौर्णीमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
३. मा.भालेकर शांताराम कोंडीबा उर्फ एस.के.बापू
४. मा.भालेकर अरुणा दिलीप
५. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
६. मा.सायकर अजय शंकरराव
७. मा.जाधव साधना रामदास
८. मा.जाधव राहुल गुलाब
९. मा.पवार संगीता शाम
१०.मा.बो-हाडे शुभांगी संजय
११.मा.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
१२.मा.मासुळकर समीर मोरेश्वर

याशिवाय श्री.दिलीप गावडे क्षेत्रीय अधिकारी, श्री.विजय वाघमारे प्रशासन अधिकारी,श्री.सतिश इंगळे कार्य.अभियंता (स्था), संदेश चव्हाण कार्य. अभियंता (वि), श्री. ओबासे कार्य.अभियंता (झोनिपु/स्था), श्री.राजेंद्र राणे, श्री.विशाल कांबळे, श्री.डी.बी.सपताळे, आबासाहेब ढवळे उप अभियंता, श्री. दाते टी.एच सहा.आरोग्य अधिकारी, श्रीम.पी.पी.गाडेकर, श्री.एन.डी.वाघ मुख्य लिपिक इ. अधिकारी सभेस उपस्थित होते.

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आल्या.

सुचक:- मा.समीर मासुळकर अनुमोदक:- मा.मंदाकिनी ठाकरे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे निवृत्त आरोग्य वैदयकीय अधिकारी डॉ.नागकुमार कुणचगी, मनपाचे शहर अभियंता श्री.एम.टी.कांबळे यांचे वडील श्री.थल्ल्यापा कांबळे, ज्येष्ठ रंगकर्मी श्री.आत्माराम भेंडे, ज्येष्ठ पत्रकार श्री.विठ्ठल विनोद व श्रीम.प्राची कुलकर्णी यांचे दु:खद निधन झाले असल्याने, त्यांना या सभेमध्ये श्रध्दांजली वाहण्याची सूचना करण्यात आली.

सदर सुचना सर्वानुमते मान्य करण्यात आली.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

मा.सभापती यांनी सर्वांचे स्वागत करुन सभा सुरु करावी असे सांगितले. दि.९/१/२०१५ च्या कार्यपत्रिका क्र. ९ व १० च्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आला.

यानंतर मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी सन्मा.सदस्य/सदस्या यांना सन २०१४-२०१५ चे सुधारित व सन २०१५-२०१६ चे मुळ अंदाजपत्रकाचे सविस्तर वाचन करुन माहिती देणेत आली.

**सन्मा.सदस्य/सदस्या यांची खालीलप्रमाणे चर्चा करणेत यावी**.

**मा.शांताराम भालेकर** :- पावसाळयापुर्वीची कामे नाले दुरुस्ती वेळचे वेळी झाली पाहिजे. नाले सफाई करणे, रस्त्यांवरील खड्डे भरणे, मोठया रस्त्याच्या खड्डयांची दुरुस्ती करणे, वॉटर लाईनचे वॉल रिपेअर करणे. ड्रेनेज चेंबर तुटलेले असतात,चेंबरची झाकणे तुटलेली आहेत. ती बदलावीत. पेव्हींग ब्लॉक टाकुन घेणे इ.छोटी कामे करणेकामी मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी संबंधितांना सूचना दयाव्यात असे सांगितले.

**मा.शुभांगी बो-हाडे**:- सन २०१४-२०१५ चे सुधारीत व सन २०१५-२०१६ चे मुळ अंदाजपत्रकाबाबत विचारणा केली. त्यावर सेक्टर क्र.२२ मधील कामांबाबत अंदाजपत्रकाचा तपशील कार्यकारी अभियंता झोनिपु स्था. यांचेकडे आहे. सभा संपल्यानंतर देण्यात येईल, असे सांगितले.

**मा.दत्तात्रय साने**:- प्रत्येक प्रभागाला एकुण किती बजेट तरतूद करणेत आली. विकास कामे प्रत्यक्ष सुरु आहेत किंवा कसे याबाबत विचारणा केली. कागदावर कामे आहेत, पण प्रत्यक्षात कामे चालु आहेत का ? हे पाहण्यासाठी गावडे साहेब, इंगळे साहेब, चव्हाण साहेब,पिरजादे साहेब यांनी माझ्या समवेत प्रभागांची पाहणी करावी.

**श्री.भाऊ नाईकवाडी, लेखापाल** - स्थापत्य विभागाने ५२ कामांच्या, विदयुत विभागाने १७ कामांच्या आणि पाणीपुरवठा विभागाने १२ कामांच्या अशा एकूण ८१ कामांच्या निविदा काढून आदेश देणेत आलेले आहेत..

**मा.शांताराम भालेकर**:- अंकुश चौक यमुनानगर, निगडी येथील फुटपाथवरील भाजी विक्रेते बसतात. यामुळे अतिक्रमण होत आहे. वाहतुक कोंडी होत आहे. यामुळे अपघात होतात. त्यावर त्वरीत कारवाई करावी.

**मा. दत्तात्रय साने, मा.शांताराम भालेकर**:- मनपाकडून जेएनएनयूआरएम कार्यक्रमांतर्गत प्लॅस्टिक बकेट वाटप किती झाले ? काही लोकांना बकेट मिळालेल्या नाहीत याबाबत माहिती दयावी.

**श्री.दाते सहा.आरोग्य अधिकारी** - बकेट वाटप रजिस्टर प्रत्येक कर्मचा-यांना देण्यात आलेले असून ते काम पूर्ण न झाल्यामुळे या विभागाकडे याबाबत माहिती उपलब्ध नाही. २८,७३४ बकेट प्राप्त झालेले असून त्यापैकी २२,६६५ बकेट वाटप झालेले आहे.

**क्षेत्रीय अधिकारी**:- सन्मा.सदस्य यांच्या ऑफीसमध्ये ज्यांना बकेट मिळालेले नाही. त्यांचे नांव व संपर्क क्रमांक यांची नोंद करतील त्यानुसार त्या नागरिकांना बकेट देणेबाबत पुढील कारवाई करणेत येईल.

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.</u>**

विषय क्र.१ चिखली येथील गट क्र.१६५५ (१) व १६५५ (२) यामधील १८ मिटर रस्त्याचे आरक्षण अन्यत्र स्थलांतरीत करणेबाबत
मा.शांताराम भालेकर व मा.अजय सायकर यांचा प्रस्ताव

विषय क्र.२ रुपीनगर मध्ये एकता चौकात कमान उभारुन "छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वार" असे नामकरण करणेबाबत
मा.शुभांगी बो-हाडे व मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव

ठराव क्र.५२ विषय क्र.१
दि.११/२/२०१५ विभाग:-
सुचक:- मा.मंदाकिनी अर्जुन ठाकरे अनुमोदक:- मा.समीर मोरेश्वर मासुळकर
संदर्भ:- मा.मंदाकिनी ठाकरे व मा.समीर मासुळकर यांचा दि. ११/२/२०१५ चा प्रस्ताव
विषय:- डबल्यू सेक्टर ते मंडई पर्यंत असलेल्या रस्त्याला स्व.बाबुराव ठाकरे (गुरुजी) मार्ग असे नांव देणेबाबत

विषय क्र.१ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा. (विषय तहकूब)

-----

ठराव क्र.५३ विषय क्र.२
दि.११/२/२०१५ विभाग:-
सुचक:-मा. शांताराम कोंडीबा भालेकर अनुमोदक:- मा. अजय शंकरराव सायकर
संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील क्र.फक्षेका/नि/कावि/९४/२०१५ दि.७/०२/२०१५ चा प्रस्ताव
विषय:- सन २०१४-२०१५ चे सुधारीत व सन २०१५-२०१६ चे मुळ अंदाजपत्रक प्रभाग समितीचे अवलोकनार्थ ठेवणेबाबत

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ क्षेत्रीय कार्यालयाचे सन२०१४-२०१५ चे सुधारीत व सन २०१५-२०१६ चे मुळ अंदाजपत्रकाचे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ९५ नुसार अवलोकन करण्यात येऊन पुढील कार्यवाहीसाठी पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

**<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.</u>**

ठराव क्र.५४ विषय क्र.३
दि.११/२/२०१५ विभाग:-
सुचक:-मा. शांताराम कोंडीबा भालेकर अनुमोदक:- मा. अजय शंकरराव सायकर
संदर्भ:- मा.शांताराम भालेकर व मा.अजय सायकर यांचा दि.११/२/२०१५ चा प्रस्ताव

विषय:- चिखली येथील गट क्र.१६५५ (१) व १६५५ (२) यामधील १८ मिटर रस्त्यांचे आरक्षण अन्यत्र स्थलांतरीत करणेबाबत

मौजे चिखली येथील गट क्र.१६५५ (१) व १६५५ (२) यामध्ये १८ मिटर रस्त्याचे आरक्षण टाकण्यात आले असुन, त्यामुळे या गटातील श्री.शिवाजी बबन मोरे या शेतक-यां च्या हिश्श्यातील ७ एकर क्षेत्रापैकी ६.५ एकर क्षेत्र आरक्षणात येत असलेने, त्यांचेवर भूमिहीन होण्याची वेळ आलेली असुन, त्यांचे कुटूंब हवालदिल झाले आहेत.त्यांना भूमीहीन होवू नयेत याकरीता १६५५ (१) व १६५५ (२) या गटातील १८ मिटर रस्त्याचे आरक्षण रद्द करुन ते गट क्र.१६५४ या सरकारी गायरानाचे क्षेत्रावर स्थलांतरीत करणेकामी मान्यता देणेत येत आहे.सदर ठराव कायम होण्याची वाट न पाहता मा.शहर सुधारणा समितीमार्फत मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्र.५५ विषय क्र.४

दि.११/२/२०१५ विभाग:-

सुचक:-मा. शुभांगी संजय बो-हाडे अनुमोदक:- मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन

संदर्भ:- मा. शुभांगी बो-हाडे व मा. मंदाकिनी ठाकरे यांचा दि.११/२/२०१५ चा प्रस्ताव

विषय:-रुपीनगर मध्ये एकता चौकात कमान टाकणेबाबत

रुपीनगर येथे प्रवेश केल्यावर ती कामगार वस्ती आहे सदर भागात प्रवेशद्वार असावे अशी नागरिकांची मागणी आहे. तरी तेथे कमान उभारुन या कमानीचे **"छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वार"** असे नामकरण करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपलेचे जाहीर केले.

सही/-
(वनिता एकनाथ थोरात)
सभापती
फ क्षेत्रीय कार्यालय

जा.क्र.फक्षेका/सभा/कावि/२५/२०१५
दि.११/२/२०१५

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
फ क्षेत्रीय कार्यालय

प्रत - सर्व संबंधित शाखा प्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना